महाराष्ट्र जनशक्ती

ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सअॅप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) वर्ष : तिसरे अंक : २१४ वे दिनांक : २९/०७/२०२६ वार : बुधवार

## नीट आंदोलनातील विद्यार्थ्यांवरील गुन्हे मागे घेणार : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांचे गृह विभागाला निर्देश



**मुंबई** : 'नीट' परीक्षा पेपरफुटीप्रकरणी कॉकरोज जनता पार्टी आणि देशभरातील विद्यार्थ्यांच्या तीव्र आंदोलनानंतर शिक्षणमंत्र्यांना राजीनामा द्यावा लागला होता. या आंदोलनाच्या काळात महाराष्ट्रासह देशभरात विविध ठिकाणी विद्यार्थ्यांवर पोलिसांनी कारवाई करत गुन्हे दाखल केले होते. मात्र, दिल्लीतील आंदोलनाच्या धर्तीवर महाराष्ट्रात झालेल्या नीट आंदोलक विद्यार्थ्यांवरील किरकोळ गुन्हे मागे घेण्याचे आदेश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी गृह विभागाला दिले आहेत. सरकारच्या या निर्णयामुळे राज्यातील हजारो आंदोलक विद्यार्थ्यांना मोठा दिलासा मिळाला आहे.


दिल्लीतील जंतर-मंतरवरील महिनाभराचे यशस्वी आंदोलन 'CJP'ने मागे घेतले असले, तरी अनेक भाजपशासित राज्यांत आंदोलनात सहभागी झालेल्या तरुणांवर गुन्हे दाखल करून कारवाई केली जात असल्याचा गंभीर आरोप 'CJP'ने पत्रकार परिषदेत केला होता. "आंदोलन मागे घेताना केंद्र सरकारने देशभरात कुठेही कोणत्याही आंदोलकावर कारवाई केली जाणार नाही, असे स्पष्ट आश्वासन दिले होते. मात्र, तरीही कारवाई सुरू राहिल्यास आणि सरकारने गुन्हे मागे घेतल्याचे लेखी आश्वासन न दिल्यास पुन्हा एकदा देशभरातील तरुण रस्त्यावर उतरतील," असा थेट इशारा 'CJP'कडून देण्यात आला होता.

दिल्लीतील आंदोलनाच्या समर्थनासाठी महाराष्ट्रात मुंबई, पुणे, नागपूर, नाशिक यांसह अनेक शहरात विद्यार्थी आणि तरुण मोठ्या संख्येने रस्त्यावर उतरले होते. काही ठिकाणी पोलिसांनी आंदोलकांना ताब्यात घेऊन गुन्हे दाखल केले होते. या सर्व पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री तथा गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी तात्काळ पाऊल उचलत आंदोलक विद्यार्थ्यांवरील किरकोळ गुन्हे मागे घेण्याचे आदेश गृह विभागाला दिले आहेत. यामुळे विद्यार्थ्यांना मोठा दिलासा मिळाला असून, आता त्यांच्या शैक्षणिक आणि भविष्यातील करिअरवर कोणताही विपरीत परिणाम होणार नाही.

नीट परीक्षेच्या प्रश्नपत्रिका फुटीच्या विरोधात राज्यभरात तीव्र झालेल्या आंदोलनांवर पोलिसांनी धडक कारवाई सुरू केली आहे. संपूर्ण महाराष्ट्राची एकत्रित अधिकृत आकडेवारी राज्य शासनाने अद्याप जाहीर केली नसली, तरी प्राप्त माहितीनुसार मुंबई हे पोलीस कारवाईचे मुख्य केंद्र ठरले आहे.

राजधानी मुंबईत गेल्या ४ ते ५ दिवसांत शिवाजी पार्क, माहीम, दादर, वरळी, सायन, कालाचौकी, भोईवाडा आणि वडाळा टीटी पोलीस ठाण्यांत एकूण १३ एफआयआर नोंदवण्यात आले आहेत. बेकायदेशीर जमाव जमवणे आणि जमावबंदीच्या आदेशांचे उल्लंघन केल्याप्रकरणी ९०० हून अधिक विद्यार्थी व कार्यकर्त्यांवर गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. याशिवाय भारतीय नागरिक सुरक्षा संहितेच्या (बीएनएसएस) कलम ३५(३) अंतर्गत ३०० हून अधिक आंदोलकांना व्हॉट्सअॅपवर नोटिसा बजावून पोलीस ठाण्यात हजर राहण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

## राष्ट्रवादीचे दोन्ही गट एकत्र येणार नाहीत - शरद पवार



**बारामती** : राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या (NCP) दोन्ही गटांच्या पुन्हा एकत्र येण्याच्या शक्यतेबद्दल मंगळवारी शरद पवार यांना विचारण्यात आले. यावर त्यांनी दोन्ही गट एकत्र येण्याचा प्रश्नच उद्भवत नाही, असे सांगितले. एक दिवसापूर्वी, राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार गट) च्या खासदार सुप्रिया सुळे आणि खासदार बजरंग सोनवणे यांनी सोमवारी केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांची भेट घेतली होती. ही भेट सुप्रिया सुळे यांच्या मुलीच्या रिसेप्शनचे आमंत्रण देण्यासाठी झाली होती. यानंतर, शरद पवार गट भाजपच्या नेतृत्वाखालील एनडीएमध्ये सामील होऊ शकतो, अशी चर्चा तीव्र झाली.राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट) प्रमुख शरद पवार आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या भेटीवर मंत्री गिरीश महाजन म्हणाले की, शरद पवार आणि पंतप्रधान मोदी यांच्या भेटीत काय चर्चा झाली, हे कोणालाच माहीत नाही. सध्या फक्त अफवा आणि तर्कवितर्क आहेत. यावर सध्या काहीही बोलता येणार नाही.गेल्या पाच दिवसांत भाजपच्या नेत्यांसोबत ही सुप्रिया सुळे यांची दुसरी महत्त्वाची भेट होती. यापूर्वी २२ जुलै रोजी त्यांनी शरद पवारांसोबत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची भेट घेतली होती. शरद पवारांनी मोदींना एक पत्रही सादर केले होते. ही बैठक सुमारे २० मिनिटे चालली होती.

या बैठकीबाबत शरद पवारांनी सोशल मीडियावर एका पोस्टमध्ये म्हटले- NEET परीक्षेतील पेपरफुटी, त्याविरोधात विद्यार्थ्यांचे आंदोलन, आंदोलनादरम्यान पोलिसांचे गैरवर्तन आणि विद्यार्थ्यांवर दाखल झालेले गुन्हेगारी खटले यासह कृषी क्षेत्राशी संबंधित अनेक मुद्द्यांवर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याशी सविस्तर चर्चा झाली.

**राष्ट्रवादी काँग्रेसमध्येच मतभेद:** पक्षाच्या वरिष्ठ नेत्यांमध्ये सत्तावाटपाबाबत एकमत नाही.

**राष्ट्रीय अध्यक्षपदाची मागणी:** सुनेत्रा यांचे मोठे पुत्र आणि खासदार पार्थ पवार यांची इच्छा आहे की विलीनीकरणानंतर सुनेत्रा पवार राष्ट्रवादी काँग्रेसच्या राष्ट्रीय अध्यक्ष व्हाव्यात आणि महाराष्ट्राचे अर्थ खाते त्यांना मिळावे.

**ज्येष्ठ नेत्यांचा आक्षेप:** सुनील तटकरे, प्रफुल्ल पटेल आणि छगन भुजबळ यांचे म्हणणे आहे की, सत्ता आणि पदांचे वाटप सर्व नेत्यांना विचारात घेऊन व्हायला हवे.

**अडून राहिल्यास अडचण:** जर सुनेत्रा गट राष्ट्रीय अध्यक्षपद, अर्थ मंत्रालय आणि महत्त्वाच्या कॅबिनेट विभागावर अडून राहिला, तर समझोता कठीण होऊ शकतो.

**शरद गटाच्या सहमतीवर प्रश्नचिन्ह:** राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) या सर्व मागण्या मान्य करण्याची शक्यता कमी मानली जात आहे.

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाची (NCP) स्थापना १० जून १९९९ रोजी शरद पवार, पी.ए. संगमा आणि तारिक अन्वर यांनी केली होती. या तिन्ही नेत्यांनी सोनिया गांधींच्या परदेशी वंशाचा मुद्दा उपस्थित करत पक्षाच्या नेतृत्वावर प्रश्नचिन्ह उपस्थित केले होते. काँग्रेसने त्यांना पक्षातून काढून टाकले. त्यानंतर या तिघांनी राष्ट्रवादी काँग्रेसची स्थापना केली.

## बंगालच्या उपसागरात कमी दाबाचा पट्टा : २९ ते ३१ जुलै दरम्यान राज्यातील विविध भागांत मध्यम ते मुसळधार पावसाचा अंदाज



**मुंबई** : बंगालच्या उपसागराकडून येणाऱ्या एका कमी दाबाच्या पट्ट्याच्या प्रभावामुळे राज्यातील विविध भागांत २९ ते ३१ जुलैदरम्यान पावसाचा जोर वाढण्याचा अंदाज आहे. या कालावधीत विदर्भ, उत्तर मराठवाडा, खानदेश, कोकण तसेच मध्य महाराष्ट्रातील घाट परिसरात मध्यम ते मुसळधार पावसाची शक्यता आहे. या कालावधीत विदर्भ, उत्तर मराठवाडा आणि खानदेश मध्ये वाऱ्याचा वेग वाढण्याची शक्यता आहे. तुलनेत मराठवाडा आणि मध्य महाराष्ट्राच्या दक्षिण भागात कमी पावसाची शक्यता आहे.

या काळात अतिवृष्टीसदृश पावसाच्या घटना घडण्याची शक्यता असल्याने सखल भागांत पाणी साचणे, नदी-नाल्यांना पूर येणे, काही प्रमाणात संरचनात्मक नुकसान होणे, वाहतुकीवर परिणाम होणे, तसेच काही ठिकाणी जनजीवन विस्कळीत होण्याची शक्यता नाकारता येत नाही. मध्य महाराष्ट्रातील घाट परिसरात काही ठिकाणी दरड कोसळण्याची शक्यता देखील नाकारता येत नाही.

सध्याच्या हवामान अंदाजानुसार, २९ जुलै रोजी कमी दाबाच्या पट्ट्याचा प्रभाव प्रामुख्याने विदर्भात, विशेषतः पूर्व विदर्भात जाणवण्याची शक्यता आहे. ३० जुलै रोजी त्याचा प्रभाव पश्चिम विदर्भ, खानदेश, उत्तर मराठवाडा, मध्य महाराष्ट्रातील घाट परिसर आणि कोकणात अधिक जाणवू शकतो. ३१ जुलै रोजी खानदेशातील काही भाग तसेच मध्य महाराष्ट्रातील घाट परिसरात पावसाचा प्रभाव राहण्याची शक्यता आहे.

मुंबई आणि मुंबई महानगर प्रदेशात ३० आणि ३१ जुलैदरम्यान पावसाचा जोर वाढण्याची शक्यता आहे. विशेषतः रायगड, ठाणे आणि पालघर जिल्ह्यांमध्ये ३० जुलै रोजी पावसाची तीव्रता अधिक राहण्याची शक्यता आहे.

विदर्भ, उत्तर मराठवाडा, खानदेश आणि मध्य महाराष्ट्रातील घाट परिसरातील नागरिकांनी या कालावधीत सतर्क राहावे. विशेषतः सखल भाग, नदी-नाल्यांच्या परिसर तसेच घाट रस्त्यांवरून प्रवास करताना अधिक काळजी घेणे आवश्यक आहे. आपत्कालीन परिस्थितीत नागरिकांनी स्थानिक प्रशासनाशी संपर्क साधावा. राज्याच्या आपत्ती व्यवस्थापन विभागाकडून नागरिकांना आवश्यक ती खबरदारी घेण्याचे आवाहन करण्यात येत आहे.

मराठवाड्यातील नं. १ चे डी.टी.पी. सेंटर
साहिल कॉम्प्युटर्स अँड मल्टी सर्व्हिसेस
डी.टी.पी. जॉब वर्क
एम.फिल-पी.एच.डी. थेसिस
मराठी, हिंदी, इंग्रजी
कलर प्रिंट स्कॅनिंग
झेरॉक्स
स्पायरल बायंडिंग
लॅमिनेशन
थेसिस बायंडिंग
विद्यापीठ गेट जवळ, जयसिंगपुरा, औरंगाबाद
8956362639, 8087880274, 9405109103

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), बुधवार २९ जुलै २०२६


## ब्रिजगोपाल तोष्णीवाल यांचा नागरी सत्कार



**जिंतूर (बी. डी. रामपूरकर) :** ब्रिजगोपाल तोष्णीवाल यांची महाराष्ट्र प्रदेश माहेश्वरी सभेच्या प्रदेशाध्यक्षपदी नुकतीच निवड झाली. त्यांचा मंगळवार (दि.२८) जुलै रोजी तालुका व्यापारी महासंघ, औषधी विक्रेता, माहेश्वरी समाज बांधवांच्या वतीने नागरी सत्कार करण्यात आला.या सत्काराला उत्तर देतांना ब्रिजगोपाल तोष्णीवाल म्हणाले की, ज्या पदावर माझी मतदानाच्या माध्यमातून निवड झाली आहे, त्या पदाला पूर्ण न्याय देण्याचे काम भविष्यात माझ्याकडून केले जाईल. माझ्याकडे येणाऱ्या प्रत्येक नागरिकाचे व सर्वसामान्यांचे काम मी प्रामाणिकपणे करणार असल्याचेही त्यांनी यावेळी सांगितले.

या वेळी व्यापारी महासंघाचे अध्यक्ष रमेश दरगड, गोविंद पोरवाल, सचिन देवकर, सुनील तोष्णीवाल, गणेश कुरहे, पुरुषोत्तम पोरवाल, प्रदीप राठी,हरिराम जेथलिया, प्रकाशसोनी, संग्राम सोनी, प्रफुल्ल साबु, पुष्कर दरगड, गजानन दरगड, प्रफुल्ल दरगड, केतन अग्रवाल, सुशील काबरा, सुदर्शन अच्छा, मंदार कोकडवार, सचिन मानधने, सत्यनारायण शर्मा, केदार चिद्रवार, घनश्याम जेथलिया, बंडू पल्लेवार, शेख शकील अहमद, सचिन रायपत्रेवार, मंचक देशमुख, कांता चिद्रवार, महेश तोष्णीवाल यांच्या सह अनेक मान्यवर उपस्थित होते.

## हुतात्मा वेदप्रकाश शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेत कारगिल विजय दिवस उत्साहात साजरा




**मुरूम (प्रा. सुधीर पंचगल्ले) :** उमरगा येथील हुतात्मा वेदप्रकाश शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था येथे कारगिल विजय दिवस उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाची सुरुवात "भारत माता की जय" या जोशपूर्ण घोषणेद्वारे करण्यात आली. कार्यक्रमाची सांगता राष्ट्रगीताने झाली.यावेळी प्रमुख वक्ते म्हणून माजी सैनिक खंडू बारगली दुधभाते उपस्थित होते. त्यांनी कारगिल युद्धाची पार्श्वभूमी, भारतीय सैनिकांचे शौर्य, त्याग व प्रतिकूल परिस्थितीतही कायम ठेवलेले मनोधैर्य याविषयी सविस्तर मार्गदर्शन केले. तसेच भारतीय सैन्यदलातील विविध तांत्रिक व कौशल्याधारित संधींबाबत माहिती देत प्रशिक्षणार्थ्यांनी आपल्या उज्ज्वल भविष्यासाठी सैन्यदलातील करिअरचा गांभीर्याने विचार करावा, असे आवाहन केले. देशांतर्गत तसेच आंतरराष्ट्रीय स्तरावरील आपल्या सेवाकाळातील अनुभवही त्यांनी विद्यार्थ्यांसमोर मांडले.आयएमसी सदस्य संतोष वकारे यांनी कारगिल विजय दिवस, केंद्रीय राखीव पोलीस दल (CRPF) स्थापना दिवस आणि भारतरत्न डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांच्या पुण्यतिथीचे औचित्य साधून मार्गदर्शन केले. त्यांनी कारगिल युद्धातील वीर जवानांच्या अद्वितीय शौर्य व बलिदानाचे स्मरण करत राष्ट्रभक्ती, शिस्त, कर्तव्यनिष्ठा आणि चारित्र्य यांचे महत्त्व अधोरेखित केले. तसेच CRPF जवानांच्या राष्ट्रसेवेचा गौरवपूर्ण उल्लेख केला. डॉ. कलाम यांच्या प्रेरणादायी जीवनकार्याचा संदर्भ देत विद्यार्थ्यांनी मोठी स्वप्ने पाहून कौशल्य, परिश्रम आणि राष्ट्रनिष्ठेच्या बळावर यश संपादन करावे, असे आवाहन केले. मीराबाई चानूसारख्या खेळाडूंचे उदाहरण देत युवकांनी सकारात्मक आदर्श स्वीकारावेत, समाजात दिशाभूल करणाऱ्या व संस्कारांना बाधा आणणाऱ्या प्रवृत्तींपासून सावध राहावे आणि विकसित भारताच्या निर्मितीत सक्रिय योगदान द्यावे, असे त्यांनी सांगितले.

यावेळी उपस्थित मान्यवर, प्रशिक्षक व प्रशिक्षणार्थी यांचे त्यांनी आभारही मानले. कार्यक्रमात गोपाळ गायकवाड व सुभाष इंगळे यांनी मनोगत व्यक्त केले. यावेळी आयएमसी सदस्य संतोष वकारे, सुभाष इंगळे, पंडित जाधव, राजेंद्र पाटील, तसेच गोपाळ गायकवाड, प्रभुलिंग स्वामी, नागनाथ माकणे (निदेशक), संस्थेतील प्रशिक्षक वृंद व प्रशिक्षणार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन पवन नाईकवाडे यांनी केले.

## संवाद प्रतिभावंतांशी या कार्यक्रमात लेखक प्रकाश त्रिभुवन

**छत्रपती संभाजीनगर (प्रतिनिधी) :** डॉ. बाबासाहेब आंबेडकर साहित्य परिषद आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर कला व वाणिज्य महाविद्यालयातील मराठी विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित "संवाद प्रतिभावंतांशी" या सृजनशील उपक्रमात ज्येष्ठ नाटककार, लेखक, चित्रपट दिग्दर्शक मा. प्रकाश त्रिभुवन हे प्रमुख व्याख्याते म्हणून मार्गदर्शन करणार असून कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी उपप्राचार्य प्रा. नागनाथ करडे हे राहतील. हा कार्यक्रम दि. ३१ जुलै २०२६ रोजी संध्याकाळी ५:०० वाजता डॉ. बाबासाहेब आंबेडकर कला व वाणिज्य महाविद्यालय येथे संपन्न होणार आहे. या कार्यक्रमासाठी उपस्थित राहण्याचे आवाहन डॉ. बाबासाहेब आंबेडकर साहित्य परिषदेच्या वतीने करण्यात आले आहे.







# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), बुधवार २९ जुलै २०२६


## ज्ञानेश्वर विद्यालय बेगमपुरा येथे 'बालविवाह जनजागृती' पथनाट्य संपन्न; दामिनी पथकाचा विशेष सहभाग




**छत्रपती संभाजीनगर :** समाजातील बालविवाहासारख्या अनिष्ट प्रथेचे निर्मूलन करण्यासाठी आणि नागरिकांमध्ये जागरूकता निर्माण करण्यासाठी बेगमपुरा येथील ज्ञानेश्वर विद्यालयातर्फे आज 'बालविवाह जनजागृती' या विषयावर एका प्रभावी पथनाट्याचे सादरीकरण करण्यात आले. या उपक्रमाला विद्यार्थ्यांसह स्थानिक नागरिकांनी अतिशय उत्तम आणि उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.या पथनाट्याच्या सादरीकरणावेळी ज्ञानेश्वर विद्यालयाच्या मुख्याध्यापिका डॉ. संध्या मोरे यांची प्रमुख उपस्थिती होती. दामिनी पथकाची उपस्थिती व मार्गदर्शन:या महत्त्वपूर्ण जनजागृतीपर कार्यक्रमात महाराष्ट्र पोलिसांच्या विशेष 'दामिनी पथका'ने सहभाग नोंदवला. दामिनी पथक प्रमुख, पोलीस उपनिरीक्षक कांचन मिरधे मॅडम यांच्या मार्गदर्शनाखाली हे पथक उपस्थित होते.

यावेळी श्रेणी पोलीस उपनिरीक्षक लता जाधव, पोलीस हेड कॉन्स्टेबल सुधाकर पवार, महिला पोलीस अंमलदार सुनिता नागलोद, पूजा जाधव, अनिता खैरे, अमृता भोपळे आणि साक्षी चंद्रे, मंगला सुलताने,आरती बिरोटे, नितिन भारती यांनी या कार्यक्रमात हिरिरीने सहभाग घेतला.बालविवाह प्रतिबंधक उपक्रमाचा मुख्य उद्देश: दामिनी पथकाचा हा बालविवाह प्रतिबंधक उपक्रम 'महिला व बालविकास विभाग' आणि 'बालकल्याण समितीच्या' सहकार्याने राबवला जाणारा एक अत्यंत प्रभावी आणि महत्त्वाचा उपक्रम आहे. राज्यातील बालविवाह रोखणे, अल्पवयीन मुलींचे हक्क सुरक्षित ठेवणे आणि समाजातील या अनिष्ट प्रथेचे निर्मूलन करणे, हा या संयुक्त उपक्रमाचा मुख्य उद्देश आहे.


ज्ञानेश्वर विद्यालयाने सादर केलेल्या या पथनाट्यामुळे या उद्देशाला अधिक बळ मिळाले असून समाजात एक सकारात्मक संदेश गेला आहे.

## मिसाईल मॅन भारतरत्न डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांना इकरा पब्लिक शाळेतर्फे भावपूर्ण आदरांजली



**जळगाव :** इकरा पब्लिक स्कूल अँड ज्युनिअर कॉलेज, मोहाडी येथे भारताचे माजी राष्ट्रपती, जागतिक कीर्तीचे शास्त्रज्ञ 'भारतरत्न' डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांच्या पुण्यतिथीनिमित्त भव्य आदरांजली कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.विद्यार्थ्यांमध्ये डॉ.कलाम यांच्या जीवनकार्यातून प्रेरणा निर्माण व्हावी व त्यांच्या स्मृतीस उजाळा मिळावा, हा या कार्यक्रमाचा मुख्य उद्देश होता.कार्यक्रमाचे प्रमुख वक्ते श्री.इश्तियाक अहमद व श्री. साजिद खान यांनी डॉ.कलाम यांच्या बहुआयामी व्यक्तिमत्त्वावर प्रकाश टाकला. "डॉ.कलाम यांच्या ऐतिहासिक कामगिरीचा संपूर्ण देशाला कायम अभिमान राहील," असे सांगतानाच त्यांनी डॉ.कलाम यांचे वाचनप्रेम आणि विद्यार्थ्यांबद्दलचा अतोनात लहानातील लहानाला जोडणारा जिव्हाळा अधोरेखित केला.देशाच्या सर्वोच्च राष्ट्रपती पदावर विराजमान झाल्यानंतरही त्यांनी शिक्षक आणि मार्गदर्शकाची आपली भूमिका कधीही सोडली नाही,असे वक्त्यांनी नमूद केले.कार्यक्रमाच्या अध्यक्षीय भाषणात प्राचार्य शेख शकील यांनी डॉ. कलाम यांच्या जीवनातील प्रेरणादायी व कमी परिचित पैलूंना उजाळा दिला.एका सामान्य व गरीब ग्रामीण कुटुंबात जन्मलेल्या बालकाने अत्यंत प्रतिकूल परिस्थितीवर मात करत कशी इतिहास घडवला आणि देशाचे सर्वोच्च स्थान भूषवले, याचे सुंदर वर्णन त्यांनी केले. तसेच जगभरातील 40 पेक्षा जास्त देशांनी डॉ.कलाम यांना मानद डॉक्टरेट पदवी देऊन सन्मानित केले होते,या त्यांच्या वैश्विक आदराचाही प्राचार्यांनी विशेष उल्लेख केला.कार्यक्रमाचे नेटके आणि सूत्रबद्ध संचालन सांस्कृतिक समन्वयक श्री.आरिफ खान यांनी केले, तर उपस्थितांचे आभार श्री.मोहसीन खान यांनी मानले.कार्यक्रमास शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## गुरूपौर्णिमेदिवशी श्री क्षेत्र अचलबेट देवस्थान पायथ्याशी घोड्यांचे गोल रिंगणाचे आयोजन



**मुरूम (प्रा. सुधीर पंचगल्ले) :** उमरगा तालुक्यातील कराळी-तुरोरी परिसरातील श्री क्षेत्र अचलबेट देवस्थान पायथ्याशी गुरूपौर्णिमा उत्सव बुधवार दि. 29 रोजी सायंकाळी 4:30 वाजता होणार आहे. याबाबतची सविस्तर माहिती अशी की, गुरूपौर्णिमेचे औचित्य साधून औराद शहा. ता. निलंगा येथून सोमवार दि. 27 रोजी सकाळी सदगुरु उज्वलानंद महाराज यांच्या पादुका, रथ, नगारा, टाळकरी, वारकरी, पताकाधारी, विनेकरी, रथातून पालखीत पादुका ठेवून हलगरा, थोर माकणी, तळीखेड पाटी, अनसरवाडा पाटी ते राज्य महामार्गावरून निलंगा येथील मंगल कार्यालयात हभप. महेश महाराज संताई आश्रम माकणी यांची सुश्राव्य किर्तन सेवा होत आहे. त्यानंतर मुक्काम होणार आहे. मंगळवार दि. 28 रोजी सकाळी सदगुरु उज्वलानंद महाराज यांच्या पादुका रथ हे निलंगा येथून दादगी, लिंबाळा, मदनसुरी मोड, भुतमुगळी, हरीजवळगा मार्गे हासोरी मुक्काम होणार आहे. या ठिकाणी हभप. दिवेगावकर महाराज यांची किर्तन सेवा होणार आहे.गुरूपौर्णिमा बुधवार दि. 29 रोजी सकाळी हासोरी येथून कासार शिर्शी मार्गे उमरगा तालुक्यातील दुधनाळ पाटी, कदमापूर पाटी, कुन्हाळी, त्रिकोळी पाटी, मुळज, तुरोरी मार्गे श्री क्षेत्र अचलबेट देवस्थान पायथ्याशी गोल रिंगणाचे ठिकाणी येणार आहेत. या रिंगणाच्या ठिकाणी बुधवार दि. 29 रोजी सकाळी कर्नाटक राज्यातील बसवकल्याण तालुक्यातील एकंबा, नवचंदवाडी, फुलदरवाडी, मळगीवाडी या चार गावातून हजारो भाविक भक्तांच्या उपस्थितीत पालख्यांचे आगमण होणार आहे. एकुण पाच पालखीचे आगमण झाल्यानंतर टाळ मृदंगाच्या जयघोषात हजारो भाविक भक्तांच्या उपस्थितीत घोड्यांचे गोल रिंगण सोहळा होणार आहे. एका घोड्यावर चोपदार तर दुसऱ्या घोड्यावर सदगुरु उज्वलानंद महाराज यांच्या पादुका ठेवून रिंगण सोहळा संपन्न होणार आहे. गुरूपौर्णिमेच्या दिवशी बुधवारी संध्याकाळी 7 ते 9 या वेळेत हभप. अनिल महाराज पाटील बार्शी यांचे सुंदर सुश्राव्य किर्तन सेवा होणार आहे. गुरूपौर्णिमेच्या दिवशी अचलबेट देवस्थान पंचक्रोशीतील हजारो भाविक भक्तांच्या उपस्थितीत सोहळा होणार असून सर्वजण उपस्थित रहावे असे आवाहन सेवक, भक्त परिवाराच्या वतीने करण्यात आले आहे.


ADMISSION OPEN

10th, 12th and Graduate Students
Government Recognised
Job Guarantee Courses

DMLT
P.G.DMLT
X-RAY
C.T.-SCAN
E.C.G.
Radiology
Physiotherapy
Optometry
O. T. TECHNICIAN
PG Radiology

Contact : 9405109103
8830838903

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), बुधवार २९ जुलै २०२६


## भ्रष्टाचारी झाले सारे!

विद्यार्थ्यांच्या भावनेशी,
खेळ खेळतात खोटे.
नीट पेपर फोडून,
पोट भरतात गोटे. 1

स्वार्थासाठी परीक्षेचे,
भांडवल करतात.
विद्यार्थ्यांच्या जीवनात,
विष मात्र पेरतात. 2

मेहनत करतांना,
रात्रभर तो जागतो.
आता पेपर फुटला,
दाद कुणाला मागतो. 3

नीट पेपर फोडून,
भ्रष्टाचारी झाले सारे.
आता शिक्षण क्षेत्रात,
वाहे विषारीच वारे. 4

भ्रष्टाचारी व्यवस्थेत,
कुठे टेकवावे माथा.
हाती घेऊन रूमणे,
मारा पाठीवर लाथा. 5



**नागेश बोंतेवाड,**
**छत्रपती संभाजीनगर**

## मी झोपू नये म्हणून

भल्या पहाटे
आई उठवायची मला
अभ्यास करण्यासाठी

मी डोळे चोळत उठायचो
अन् घ्यायचो हातात पुस्तक
तेव्हा आकाश उजळून गेलेलं
असायचं

पण झोप काही सोडत नव्हती साथ
लागायचे डोळे अलगद
साखर झोपेच्या मोहाने

तेव्हा म्हणायची आई
उठ बाळा
ज्ञानाचा दिवा पेटल्याशिवाय
होणार नाही दूर
घरात मुक्कामाला आलेला
युगानुयुगांचा अंधार...

अन्
घडणार नाही चमत्कार
एका रात्रीत
त्यासाठी करावी लागेल सुरुवात
अभ्यासाने..
'असाध्य ते साध्य करिती सायास '
या तुकोबांच्या मंत्राला प्रमाण
मानून..

तेव्हा माझ्या डोळ्यांतल्या झोपेपेक्षा
तिच्या डोळ्यांतला लख्ख उजेड
मोठा वाटायचा...

आज कळतंय..

लेकरांच्या सुखासाठी
राबत होती माय
अज्ञानातून ज्ञानाकडे
नेत होती माय

उजेडाच्या स्वप्ना करता
जळत होती माय
जिंकण्याचा विश्वास
देत होती माय

मी झोपू नये म्हणून
जागत होती माय..



**ज्ञानेश्वर गायके,**
**कन्नड**

# राजसत्तेत जाणे हे देशाला लुटण्यासाठी नसून प्रगतीचे वाटसुरू बनणे आवश्यक आहे

**मि**त्रांनो, आज आपण थोड्याशा वेगळ्या विषयाला न्याय देण्यासाठी,अभ्यास करण्यासाठी चिंतन करणार आहोत.भारत हा केवळ भौगोलिक सीमांनी बांधलेला देश नाही. हा त्यागाचा, संघर्षाचा, संस्कारांचा आणि असंख्य सामान्य माणसांच्या स्वप्नांचा देश आहे. या देशासाठी कुणीतरी तुरुंगवास भोगला, कुणीतरी फासावर चढले, कुणीतरी घरदार सोडले, तर कुणीतरी आपल्या आयुष्याचा प्रत्येक क्षण समाजासाठी अर्पण केला.म्हणूनच आज मनाला एक प्रश्न सतत अस्वस्थ करतो,ज्या स्वातंत्र्यासाठी हजारो लोकांनी बलिदान दिले, त्या भारतातील राजसत्ता आजही सत्तेचा उपभोग घेणाऱ्यांची असावी का, की जनतेची सेवा करणाऱ्यांची?राजकारण हे पद मिळवण्याचे साधन नसावे. सत्ता ही संपत्ती, प्रतिष्ठा किंवा अहंकार वाढवण्याचे माध्यम नसावे. राजसत्ता म्हणजे जनतेने दिलेली पवित्र जबाबदारी आहे.ज्याच्या हातात सत्ता येते, त्याच्या हातात केवळ खुर्ची येत नाही; त्या हातात गरीब शेतकऱ्याचे भविष्य येते, बेरोजगार तरुणाचे स्वप्न येते, आईच्या डोळ्यातील आशा येते, विद्यार्थ्याच्या शिक्षणाची संधी येते आणि सामान्य माणसाचा विश्वास येतो.पण दुर्दैवाने अनेकदा सत्ता ही सेवेसाठी नव्हे, तर स्वतःच्या आणि आपल्या लोकांच्या विकासासाठी वापरली जाते. जनतेच्या नावाने मिळालेली सत्ता जनतेपासूनच दूर जाते. निवडणुकीच्या काळात सामान्य माणूस महत्त्वाचा ठरतो; पण निवडणूक संपल्यानंतर त्याच सामान्य माणसाचा आवाज अनेकदा राजवाड्यांच्या भिंतींवर जाऊन हरवतो.ही व्यवस्था बदलली पाहिजे.भविष्यातील भारतात राजसत्ता ही लुटारूंची पदे नसून सेवकांची पदे असली पाहिजेत. राजकारणात येणारा प्रत्येक व्यक्ती स्वतःला राजा समजणारा नसून जनतेचा सेवक समजणारा असला पाहिजे.ज्याला सत्ता मिळेल त्याने प्रथम स्वतःला विचारले पाहिजे"मी या पदाचा उपयोग माझ्यासाठी करणार आहे की माझ्या देशासाठी?"भारताला आज केवळ लोकप्रिय नेत्यांची गरज नाही. भारताला गुणवंत, प्रामाणिक, संवेदनशील, अभ्यासू आणि सेवाभावी नेतृत्वाची गरज आहे.गावातील शिक्षक, प्रामाणिक डॉक्टर, शेतकऱ्यांसाठी झटणारा कार्यकर्ता, समाजासाठी आयुष्य देणारा स्वयंसेवक, वैज्ञानिक, उद्योजक, पर्यावरणासाठी काम करणारा तरुण, शिक्षणासाठी संघर्ष करणारी महिला, या सर्व गुणवंतांना राजकारणात स्थान मिळाले पाहिजे.कारण ज्याने समाज जवळून पाहिला आहे, त्यालाच समाजाचे दुःख समजते.ज्याने शेतकऱ्याच्या शेतात पाय ठेवला आहे, त्यालाच शेतकऱ्याची वेदना समजते.ज्याने गरीब विद्यार्थ्याच्या हातात पुस्तक दिले आहे, त्यालाच शिक्षणाची खरी ताकद समजते.ज्याने दुष्काळात पाण्यासाठी मैलोनमैल चालणाऱ्या महिलांना पाहिले आहे, त्यालाच जलसंवर्धनाचे महत्त्व कळते.आणि ज्याने समाजाच्या दुःखात स्वतःचे सुख विसरले आहे, तोच खरा लोकप्रतिनिधी होऊ शकतो.भारताला आता वारसाहक्काच्या राजकारणापेक्षा गुणवत्तेच्या राजकारणाची गरज आहे.पद मोठे नसते; त्या पदावर बसलेली व्यक्ती मोठी असते. खुर्ची कोणालाही मोठे बनवत नाही. खुर्चीवर बसल्यानंतर आपण किती लोकांचे जीवनमान बदलले, किती अश्रू पुसले, किती तरुणांना रोजगार दिला, किती शेतकऱ्यांना उभे केले, किती मुलांना शिक्षण दिले,यावर त्या व्यक्तीचे मोठेपण ठरले पाहिजे.आज भारतातील तरुणांच्या मनात प्रचंड ऊर्जा आहे. पण या ऊर्जेला योग्य दिशा देण्याची गरज आहे. तरुणांनी केवळ राजकीय घोषणा देणारे कार्यकर्ते न बनता, विचार करणारे, प्रश्न विचारणारे आणि देश घडवणारे नागरिक बनले पाहिजे.लोकशाहीमध्ये मत देणे ही केवळ जबाबदारी नाही; तर योग्य व्यक्तीची निवड करणे ही राष्ट्रनिर्मितीची प्रक्रिया आहे.आपण जात, धर्म, पैसा, भीती आणि प्रलोभन यांच्या आधारावर नेतृत्व निवडत राहिलो, तर आपल्याला त्याच पद्धतीची व्यवस्था मिळेल.पण आपण जर शिक्षण, प्रामाणिकपणा, कर्तृत्व, सेवा आणि गुणवत्तेच्या आधारावर नेतृत्व निवडले, तर भारताची राजकीय संस्कृती निश्चितच बदलेल.राजकारणात पैसा खर्च करणाऱ्यांपेक्षा विचार खर्च करणारे लोक आले पाहिजेत.सत्तेचा उपभोग घेणाऱ्यांपेक्षा सत्तेचा त्याग करणारे सेवक आले पाहिजेत.जनतेला वापरणारे नेते नव्हे, तर जनतेसाठी स्वतःला वापरून घेणारे नेते आले पाहिजेत.माझ्या स्वप्नातील भारत असा आहेजिथे नेता सरकारी रुग्णालयात उपचार घेण्यास लाजणार नाही.जिथे लोकप्रतिनिधी सरकारी शाळेच्या गुणवत्तेवर स्वतःच्या मुलांच्या भविष्याइतकेच प्रेम करेल.जिथे शेतकऱ्याचा प्रश्न हा केवळ निवडणुकीचा मुद्दा नसेल, तर शासनाची सर्वोच्च प्राथमिकता असेल.जिथे तरुणांच्या हातात केवळ मोबाईल नसेल, तर कौशल्य आणि रोजगार असेल.जिथे मुलींच्या शिक्षणासाठी योजना कागदावर न राहता त्यांच्या जीवनात उतरतील.जिथे प्रत्येक गावात पाणी, शिक्षण, आरोग्य आणि रोजगार यांना मूलभूत अधिकारासारखे महत्त्व मिळेल.आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे,जिथे राजकारणी स्वतःला जनतेचा मालक नव्हे, तर जनतेचा सेवक समजेल.भारताची खरी शक्ती दिल्लीतील इमारतींमध्ये नाही. भारताची शक्ती गावातील शेतकऱ्याच्या घामात आहे. भारताची शक्ती कामगाराच्या कष्टात आहे. भारताची शक्ती विद्यार्थ्यांच्या स्वप्नात आहे. भारताची शक्ती महिलांच्या संघर्षात आहे. भारताची शक्ती सैनिकाच्या त्यागात आहे. भारताची शक्ती सामान्य माणसाच्या प्रामाणिकपणात आहे.या सामान्य माणसाच्या शक्तीला योग्य नेतृत्व मिळाले, तर भारताला जगातील कोणतीही ताकद थांबवू शकणार नाही.म्हणूनच भविष्यातील भारतासाठी आज आपण एक नवा विचार स्वीकारला पाहिजे,सत्ता ही संपत्ती नसते. सत्ता ही जबाबदारी असते.पद हे प्रतिष्ठेचे चिन्ह नसते. पद हे सेवेसाठी मिळालेले साधन असते.राजकारण हे कमाईचे क्षेत्र नसते. राजकारण हे राष्ट्रनिर्मितीचे माध्यम असते.माझा विश्वास आहे की येणाऱ्या काळात भारतातील जनता अधिक जागरूक होईल. ती प्रश्न विचारेल. ती कामाचा हिशोब मागेल. ती गुणवंतांना पुढे आणेल. आणि एक दिवस असा नक्की येईल की, राजसत्ता ही लुटारूंच्या हातातील साधन न राहता सेवाभावी, प्रामाणिक आणि गुणवंत लोकांच्या हातातील राष्ट्रनिर्मितीचे पवित्र माध्यम बनेल.त्या दिवशी भारत केवळ आर्थिकदृष्ट्या महासत्ता होणार नाही; तर नैतिकदृष्ट्या, सामाजिकदृष्ट्या आणि मानवी मूल्यांच्या दृष्टीनेही जगाचे नेतृत्व करेल.कारण भारताला महान बनवणारी गोष्ट केवळ मोठी अर्थव्यवस्था नाही,भारताला महान बनवणारी गोष्ट म्हणजे जनतेसाठी जगणारी माणसे.आणि माझ्या भारताच्या भविष्यासाठी माझी एकच प्रार्थना आहे,"देवा, आम्हाला सत्तेचे मालक नको देऊस;जनतेचे सेवक दे.आम्हाला प्रसिद्धीच्या मागे धावणारे नेते नको देऊस;कर्तृत्वाने इतिहास घडवणारे गुणवंत दे.आणि भारताला फक्त राज्य करणारे लोक नको देऊस;भारताला घडवणारे लोक दे."

**चिंतन :- भूमिपुत्र वाघ**


प्रवेश सुरू
डी.एम.एल.टी.
P.G.DMLT
फिजोओथेरिपी
डिप्लोमा ऑप्थोमेट्री
OT टेक्नीशियन
X-Ray, ECG
रेडीओलॉजी
संपर्क
9405109103



## जाहिरात दर

| | | |
|---|---|---|
| १. | पूर्ण पान (मल्टीकलर) | ५०००/- |
| २. | अर्धे पान (मल्टीकलर) | ३०००/- |
| ३. | पाव पान (मल्टीकलर) | २०००/- |
| ४. | शुभेच्छा जाहिरात | ६००/- |

## गुणवंताचे कौतुक करणारी बलस्थाने उमरग्याची कर्मभूमी देत आहे



**उमरगा (प्रतिनिधी) :** गुणवंताचे कौतुक करणारी बलस्थाने उमरगाची कर्मभूमी देत आहे असे प्रतिपादन समाज सेवक भूमिपुत्र वाघ केले. अनिकेत बिभीषण सुरवसे यांच्या सत्कार प्रसंगी भूमिपुत्र वाघ बोलत होते. कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी म्हणून. अनिल मूडमे आणि प्रोफेसर राजेंद्र इंगोले सर हे होते. अनिकेत बिभीषण सुरवसे यांनीनिट २०२६ परीक्षेत ५४० गुण मिळऊन .ऑल इंडिया रँक ४९९८३ व एस सी कॅटेगरी रँक -१४५० अशी घेऊन घवघवीत यश संपादन केले. म्हणून अनिकेत सूरवसे यांच्या विशेष सत्काराचे आयोजन विठ्ठल रुक्मिणी मंदिर जिजाऊ चौक उमरगा या ठिकाणी करण्यात आले होते. या कार्यक्रमाला उमरगा शहरातील प्राध्यापक, शिक्षक, वकील, इंजिनीयर असे गुणवंत नामवंत मित्रगण उपस्थित होते सोबत आजी-श्रीमती कमलबाई नरसिंगराव सुरवसे,वडील -श्री बिभीषण नरसिंगराव सुरवसे आई-सौ जयश्री बिभीषण सुरवसे यांचाही याप्रसंगी सत्कार आयोजित केला होता. यावेळी प्रमुख अतिथी म्हणून श्री इंगोले सर यांनी भविष्यात फक्त एम बी बी एस करून न थांबता पुढे पी जी करून गोरगरीब जनतेसाठी चांगली आरोग्यसेवा करावी अशी इच्छा व्यक्त केली. अनिल मोडवे यांचा वाढदिवस याप्रसंगी साजरा करण्यात आला त्यांनीही अनिकेत यांना भरभरून शुभेच्छा दिल्या. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आयोजन गोविंद कुंभार यांनी केले या प्रसंगी शशिकांत डांगे,सचिन डांगे,अंकुश ईदगार,रोहीदास मुळजे,श्री दयानंद पाटील सर, पंडित शिंदे,प्रा. नाबदे,रामभाऊ पतंगे ई मित्र परिवार उपस्थित होते याप्रसंगी अनिकेत यांच्यावर पुष्पवृष्टी करून स्वागत आणि सत्कार केला.


१० वी, १२ वी पास (कोणतीही शाखा)

विद्यार्थ्यांसाठी सुवर्ण संधी

D.M.L.T

Diploma In Medical Laboratory Technology

- महाराष्ट्र पॅरामेडीकल कॉन्सीलमध्ये नोंदणी करता येते.
- सरकारी / निमसरकारी हॉस्पीटलमध्ये लॅब असिस्टंट होण्याची संधी.
- शासकीय नोकरीसाठी मान्यता प्राप्त.
- हा कोर्स झाल्यानंतर डायरेक्ट BSC ला ॲडमीशन भेटेल ११ वी, १२ वी सायन्स करण्याची गरज नाही.

डॉ.दत्ताभाऊ पाथ्रीकर शिक्षण प्रसारक मंडळ संचलित

मातोश्री डॉ.कंचन शांतीलालजी देसरडा पॅरामेडिकल कॉलेज.

बीबीका मकबऱ्याच्या मागे, हनुमान टेकडीजवळ, पहाडसिंगपुरा, छ.संभाजीनगर (औरंगाबाद.)

9405109103
8830838903


## परभणी-मुदखेड रेल्वे मार्गाच्या आधुनिकीकरणासाठी १६३ कोटी मंजुर

**बीड (भगवंत पाळवदे) :** भारतीय रेल्वेने दक्षिण-मध्य रेल्वेच्या नांदेड विभागातील परभणी-मुदखेड दुहेरी रेल्वे मार्गाच्या आधुनिकीकरणासाठी महत्त्वाचा निर्णय घेताना १६३ कोटींच्या प्रकल्पाला मंजुरी दिली आहे. या प्रकल्पाअंतर्गत मार्गावरील विद्यमान इलेक्ट्रीक ट्रॅक्शन (विद्युत पुरवठा) प्रणालीचे संपूर्ण आधुनिकीकरण करण्यात येणार असून, त्यामुळे या मार्गावरील प्रवासी तसेच मालवाहतूक रेल्वेची क्षमता आणि गती दोन्हींमध्ये लक्षणीय वाढ होणार आहे. विशेष म्हणजे, भविष्यात 'वंदे भारत एक्स्प्रेस'सारख्या वेगवान रेल्वेगाड्यांचे अधिक कार्यक्षम संचालन करण्यासाठीही हा प्रकल्प महत्त्वाचा ठरणार आहे.या प्रकल्पांतर्गत सुमारे १६४ ट्रॅक रेल्वे मार्गावर सध्या कार्यरत असलेली १x२५ केव्ही इलेक्ट्रिक ट्रॅक्शन प्रणाली बदलून अत्याधुनिक आणि अधिक क्षमतेची २x२५ केव्ही प्रणाली बसविण्यात येणार आहे. त्याचबरोबर वाढीव वीजभार हाताळण्यासाठी आवश्यक असलेल्या वीज पुरवठा यंत्रणा, उपकेंद्रे आणि संबंधित पायाभूत सुविधांचेही आधुनिकीकरण केले जाणार आहे. यामुळे रेल्वेगाड्यांना अधिक स्थिर आणि अखंड वीजपुरवठा उपलब्ध होईल, तसेच रेल्वे वाहतुकीतील अडथळे कमी होण्यास मदत होईल.परभणी-मुदखेड रेल्वे मार्ग हा भारतीय रेल्वेच्या 'हायली युटिलाइज्ड नेटवर्क' (एचयूएन रूट-९) मधील अत्यंत महत्त्वाचा दुवा मानला जातो. हा मार्ग अजमेर, इंदूर, खंडवा, अकोला, पूर्णा, मुदखेड, सिकंदराबाद, मेहबूबनगर आणि धोन यांसारख्या प्रमुख शहरांना आणि औद्योगिक क्षेत्रांना जोडतो. त्यामुळे या मार्गावरील क्षमतावाढीचा थेट लाभ प्रवासी वाहतूक, उद्योग आणि व्यापार क्षेत्रालाही होणार आहे.

या आधुनिकीकरणामुळे उच्च वेगाच्या रेल्वेगाड्या अधिक सुरक्षित आणि कार्यक्षम पद्धतीने धावू शकतील. तसेच मालवाहतूक रेल्वेची वहनक्षमताही वाढणार असल्याने भारतीय रेल्वेने २०२९-३० पर्यंत ३,००० दशलक्ष टन मालवाहतुकीचे निर्धारित केलेले उद्दिष्ट गाठण्यास मोठी मदत होणार आहे.

वाढत्या रेल्वे वाहतुकीच्या पार्श्वभूमीवर देशातील सर्वाधिक वर्दळीच्या मार्गांची क्षमता वाढविण्यासाठी आणि आधुनिक रेल्वे पायाभूत सुविधा उभारण्यासाठी हा प्रकल्प एक महत्त्वाचा टप्पा मानला जात आहे

## भागीरथी विद्यालयात लेखक कवी आपल्या भेटीला उपक्रम संपन्न!



**वैजापूर :** तालुक्यातील नालेगाव येथील भागीरथी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात लेखक - कवी विध्यार्थ्यांच्या भेटीला या उपक्रमांतर्गत डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या बी.ए. तृतीय वर्ष अभ्यासक्रमात कवितांची निवड झालेल्या मराठवाड्यातील प्रसिद्ध कवींचा सन्मान सोहळा पार पडला कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विद्यालयाचे प्राचार्य श्री.बी.एम हजारे हे होते तर प्रमुख पाहुणे म्हणून बोरसर केंद्राचे केंद्रप्रमुख जगदीश कोठावदे, कवी श्री.सुनील डोके संभाजीनगर, ज्ञानेश्वर गायके कन्नड, अशोक गायकवाड वैजापूर, गीतकार लक्ष्मण वाल्डे, प्रगतीशील शेतकरी अशोक जगताप, संस्थेचे संचालक दत्तात्रय सुरासे आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाच्या सुरुवातीला भागीरथी माई यांच्या प्रतिमेचे पूजन करून दिपप्रज्वलन करण्यात आले. याप्रसंगी सर्व मान्यवरांचा बी. ए. अभ्यासक्रमात कवितांची निवड झाल्याबद्दल वरील कविंचा शाल, बुके आणि स्व. विकास जगताप यांचा 'बाप बांधावर उभा' हा काव्यसंग्रह भेट देऊन सन्मान करण्यात आला. स्व. ना. वि. पठारे यांची 'वेदनांचे वेद'या कविता संग्रहातील 'महाराष्ट्र माझा 'ही कविता विदयापीठाच्या तृतीय वर्षात निवडण्यात आली आहे. त्या कवितेचे वाचन करण्यात आले.यावेळी मान्यवरांनी आपापल्या कविता सादर करून विद्यार्थ्यांना मंत्रमुग्ध केले व कविता कशा तयार कराव्या याबद्दल मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मराठी विभाग प्रमुख प्रमोद एन.पठारे यांनी केले तर आभार गणेश जगताप यांनी मानले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी भरत निंबाळकर, सुनील भवर, प्रमोद चव्हाण, राजेश्वर विभुते, प्रमोद रिंढे, प्रवीण जाधव, मनिषा उभेदळ, सागर राजपूत, रोहिदास त्रिभुवन, भारत भोपळे, गंगाधर कटारे, निर्मला सपकाळ, योगेश शिंदे, सुरज साळवे, समाधान सुरासे, ज्ञानदेव तायडे, सुनील बोडखे, अमोल त्रिभुवन, उत्तम सरोवर, विशाल साबळे यांनी परिश्रम घेतले.

महाराष्ट्र जनशक्ती
website: www.maharashtrajanshaktinews.com
छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), बुधवार २९ जुलै २०२६

# अय्युब पठाण यांना बाल साहित्य पुरस्कार



**छत्रपती संभाजीनगर (प्रतिनिधी) :** बालभारतीच्या पाठ्य-पुस्तकातील प्रसिद्ध कवी तथा लेखक अय्युब पठाण लोहगावकर यांना कोल्हापूर जिल्ह्यातील गारगोटी येथील शतकोत्तर सुवर्ण महोत्सवी शाहू वाचनालय आणि अक्षर साहित्य मंच गारगोटी यांच्या वतीने ता. भुदरगड जि. कोल्हापूर येथे नुकतेच राज्यस्तरीय उत्कृष्ट बाल साहित्य पुरस्कार अय्युब पठाण लोहगावकर यांच्या " अंगत पंगत " या रंगीत चित्र असलेला बालकविता संग्रहाला आषाढी वारीच्या शुभ मुहूर्तावर हा पुरस्कार देण्यात आला आहे. बालकांच्या मनातला वेध घेणाऱ्या आणि बालमनावर सुसंस्कार घडविणाऱ्या, आशयघन बालकविता असणाऱ्या या रंगीत " अंगत पंगत " या कवितासंग्रहाला हा सातवा राज्यस्तरीय पुरस्कार मिळालेला आहे. या पुरस्काराचे स्वरूप रोख रक्कम, स्मृतीचिन्ह व सन्मानपत्र असे आहे.

यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष श्री. डॉ. मा.ग. गुरव उपाध्यक्ष श्री. डि. व्ही. कुंभार, सचिव श्री. बा.स. जठार यांनी श्री.अय्युब पठाण यांना उत्तरोत्तर दर्जेदार आणि प्रतिभा संपन्न साहित्याची निर्मिती आपल्या हाताने होत राहो. अशा शुभेच्छा दिल्या आहे. या यशाबद्दल श्री. अय्युब पठाण यांचे सर्वत्र कौतुक होत आहे.

# अजय जाधव यांना अजितदादा पवार पुरस्कार प्रदान



**कन्नड(अरुण थोरात) :** तालुक्यातील खेडा येथील प्रगतीशील शेतकरी कृषिभूषण अजय जाधव यांना अजितदादा पवार सन्मान पुरस्कार प्रदान करण्यात आला.नैसर्गिक शेती, देशी बियाणे संवर्धन, शेतकरी प्रशिक्षण, लाखो शेतकऱ्यांचे जीवनमान उंचावले, तसेच नैसर्गिक शेतीचे कृषी पर्यटन आणि शाश्वत शेतीच्या प्रसारासाठी केलेल्या कार्याची दखल घेत राष्ट्रवादी पक्षामार्फत हा पुरस्कार देण्यात आला. छत्रपती संभाजीनगर येथील देवगिरी कॉलेज मधील रवींद्रनाथ टागोर हॉलमध्ये हा पुरस्कार सोहळा पार पडला. पुणे येथील लोकमतचे संपादक संजय आवटे, आमदार सतीश चव्हाण, स्वातीताई कोल्हे, संतोष कोल्हे तसेच इतर मान्यवरांच्या हस्ते हा पुरस्कार देण्यात आला.स्व. अजितदादा पवार यांनी महाराष्ट्राच्या शेतीमध्ये आधुनिक तंत्रज्ञानाचा अवलंब, सिंचन व्यवस्थेचा विकास, उत्पादनवाढ आणि शेतकऱ्यांच्या प्रगतीसाठी सातत्याने दूरदृष्टीने काम केले. त्यांच्या कार्यातून प्रेरणा घेत नैसर्गिक, शाश्वत आणि तंत्रज्ञानाधारित शेतीचा प्रसार करण्यासाठी अधिक जोमाने कार्य करत राहीन असे यावेळी अजय जाधव यांनी सांगितले.

## माझे पहिले गुरु

आईच्या मायेतील पहिली शिकवण
वडिलांच्या कष्टात जीवनाचं दान
संस्कारांची शिदोरी देत चालत राहिले
प्रेमाने आम्हाला माणूस घडवत राहिले.

हात धरून चालायला शिकवलं
सत्याच्या वाटेवर जगायला शिकवलं
ज्ञान, नम्रता, कर्तव्य आणि विश्वास
यांनीच उजळला आयुष्याचा प्रत्येक श्वास.

गुरु फक्त वर्गात भेटत नाही
तो प्रत्येक चांगल्या कृतीत दिसतो
आई _ वडिलांच्या रूपाने लाभलेलं गुरुतत्व
आयुष्यभर हृदयात जपावसं वाटतं.

जगात अनेक गुरु भेटतील
ज्ञानाचे अनेक दरवाजे उघडतील
पण माणूस म्हणून जगायला शिकवणारे
आई _ वडील आयुष्याचे खरे गुरु ठरतील.

त्यांच्या त्यागाला नाही मोजमाप
त्यांच्या प्रेमाला नाही कोणतही उत्तर
त्यांच्या संस्कारांच्या प्रकाश्यामुळेच
उजळतो माझ्या जीवनाचा प्रत्येक प्रहर.

गुरु शोधण्यासाठी नेहमी
आश्रमात जाण्याची गरज नसते
अनेकदा आईच्या मायेतील आणि वडिलांच्या
कष्टातील शिकवणच सर्वोत्तम गुरु ठरते.



**गीता सुमन गणेश खरात**
कायगाव, ता. सिल्लोड
जिल्हा छत्रपती संभाजीनगर



# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), बुधवार २९ जुलै २०२६

## लग्नाचे आमिष दाखवून महिला वकिलाची फसवणूक



**पुणे :** लग्नाचे आमिष दाखवून एका महिला वकिलाची फसवणूक करत तिचे लैंगिक व आर्थिक शोषण केल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. या प्रकरणी, जन्मलेल्या मुलीचा स्वीकार करण्यास नकार देत महिलेला धमकावल्याबद्दल एका पोलिस हवालदाराविरुद्ध बारामती शहर पोलिस ठाण्यात गंभीर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. कायदेशीर आणि सुरक्षेच्या कारणास्तव पीडित महिलेची ओळख गोपनीय ठेवण्यात आली आहे.

या प्रकरणी रमेश मोहन जाधव (पोलिस हवालदार, बक्कल क्र. ५६१, सध्या नियुक्ती – खडकी, पुणे; मूळ रा. निंभोरे, ता. करमाळा, जि. सोलापूर) या आरोपीवर कायदेशीर कारवाई करण्यात आली आहे. पोलिसांत दाखल झालेल्या माहितीनुसार, आरोपी जाधव याच्याविरुद्ध २७ जुलै २०२६ रोजी गु. र. क्र. २९७/२०२६ अन्वये, भारतीय न्याय संहितेच्या (BNS) कलम ६९, ८१, ३५१(२), ३५१(३) आणि ३१८ अंतर्गत हा गुन्हा नोंदवण्यात आला असून, पोलिस या प्रकरणाचा अधिक तपास करत आहेत.

फिर्यादीत नमूद केल्यानुसार, पीडित महिला व्यवसायाने वकील असून, २०२४ मध्ये न्यायालयीन कामकाजादरम्यान तिची आरोपीशी ओळख झाली होती. सुरुवातीला केवळ कामापुरता मर्यादित असलेला हा संवाद पुढे मोबाईल, मेसेज आणि प्रत्यक्ष भेटीगाठींमधून वाढत गेला. याच दरम्यान, आपले पहिले लग्न मोडले असून पत्नीपासून आपण अनेक वर्षांपासून विभक्त राहत असल्याचे सांगत, आरोपीने पीडित महिलेशी कायदेशीर विवाह करण्याचे वारंवार आश्वासन दिले.

"तूच माझी होणारी पत्नी आहेस" आणि "आयुष्यभर मी तुझी साथ सोडणार नाही", अशा भूलथापा देऊन आरोपीने महिलेचा पूर्ण विश्वास संपादन केला. त्यानंतर स्वतःला आर्थिक अडचण असल्याचे कारण पुढे करत त्याने पीडितेकडून ४० हजार रुपये उकळले. एवढेच नव्हे तर, त्याच दिवशी तिला बारामती येथील एका लॉजवर नेऊन, विवाहाचे पुन्हा खोटे आश्वासन दिले आणि फसवणूक करत तिच्याशी शारीरिक संबंध प्रस्थापित केल्याचा गंभीर आरोप पीडितेने तक्रारीत केला आहे.

दरम्यान, लॉजवरील घटनेनंतर आरोपीने आपल्या नातेवाईकांसह फिर्यादीच्या घरी जाऊन विवाहाबाबत चर्चा केल्याने, त्याचे आश्वासन खरे असल्याचा फिर्यादीचा विश्वास अधिकच दृढ झाला. काही दिवसांनी, एका मंदिरात आरोपीने स्वतःच्या गळ्यातील सोन्याची साखळी फिर्यादीच्या गळ्यात मंगळसूत्र म्हणून घातली आणि "आता तू माझी कायदेशीर पत्नी आहेस" असे तिला सांगितले. यानंतर, जेऊर व निंभोरे परिसरात पत्नी म्हणूनच तिची ओळख करून देत, काही काळ त्याने तिच्यासोबत सहजीवन व्यतीत केले. याच काळात फिर्यादी महिला गर्भवती राहिली, मात्र त्यानंतर आरोपीच्या वागणुकीत अचानक मोठा बदल झाला. फिर्यादीच्या तक्रारीनुसार, त्याने तिची कोणतीही शारीरिक, मानसिक किंवा आर्थिक जबाबदारी स्वीकारली नाही. उलट, वारंवार संशय घेऊन वाद घालणे, मानसिक त्रास देणे, उपचारासाठी मदत न करणे आणि गर्भधारणेच्या काळात तिला पूर्णपणे एकटे सोडणे, अशी अत्यंत क्रूर वागणूक त्याने दिली.

## शिष्यवृत्ती परीक्षेत जि.प.प्रा. शाळा कळंकी शंभर टक्के



**कन्नड (अरुण थोरात):** शासनाच्या वतीने घेण्यात आलेल्या इयत्ता सातवीच्या स्कॉलरशिप (शिष्यवृत्ती) परीक्षेत जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, कळंकी ता. कन्नड येथील विद्यार्थ्यांनी दैदिप्यमान कामगिरी करत शाळेच्या यशाची परंपरा कायम राखली आहे. या परीक्षेमध्ये शाळेचा निकाल शंभर टक्के लागला असून सर्वच्या सर्व सात विद्यार्थी पात्र ठरले आहेत.शिष्यवृत्ती परिक्षेस शाळेतील सात विद्यार्थी बसले होते. सर्वच परिक्षार्थी उतीर्ण झाल्याने पालक ग्रामस्थांनी आनंद व्यक्त केला आहे. यातील तीन विद्यार्थ्यांनी ८० टक्क्या पेक्षा जास्त गुण मिळवून विशेष प्राविण्य मिळवले आहे. यशस्वी विद्यार्थ्यां मध्ये मानवी कारभारी थोरात, आरुषी कचरू थोरात, गोपाल चत्रभुज थोरात, अनन्या दिगंबर वाणी, वैभव संदीप दाभाडे, विशाल विकास जाधव, प्राची नानासाहेब थोरात हे उतीर्ण झाले आहेत. विद्यार्थ्यांच्या या उज्वल यशाबद्दल "आपले यश हे आमचा अभिमान आहे." या भावनेने यशस्वी विद्यार्थ्यांचे, त्यांना मार्गदर्शन करणारे वर्गशिक्षक दादासाहेब पोकळे, मुख्याध्यापक राहुल राठोड यांचेसह सर्वच शिक्षक तसेच सर्व पालकांचे परिसरातून अभिनंदन व कौतुक होत आहे.

## गुरु : अज्ञानातून ज्ञानाकडे नेणारा जीवनदीप

**"गुरुर्ब्रह्मा गुरुर्विष्णुः गुरुर्देवो महेश्वरः ।गुरुः साक्षात् परब्रह्म तस्मै श्रीगुरवे नमः ॥**"भारतीय संस्कृतीत गुरुचे स्थान किती उंच आहे, याचा प्रत्यय या श्लोकातून येतो. गुरु हे सृजन करणारे ब्रह्मा आहेत, पालन करणारे विष्णू आहेत आणि अज्ञानाचा नाश करणारे महेश आहेत. गुरु ही केवळ व्यक्ती नसून ती एक चेतना आहे, जी माणसाच्या अंतःकरणात ज्ञान, विवेक आणि संस्कारांची ज्योत प्रज्वलित करते.गुरु पौर्णिमा हा केवळ एका दिवसाचा उत्सव नाही; तर तो भारतीय ज्ञानपरंपरेचा गौरवदिन आहे. महर्षी व्यास यांच्या स्मरणार्थ साजरा होणारा हा दिवस आपल्या जीवनाला दिशा देणाऱ्या प्रत्येक गुरुजनांप्रती कृतज्ञता व्यक्त करण्याचा दिवस आहे. 'गु' म्हणजे अंधार आणि 'रु' म्हणजे तो दूर करणारा. म्हणून अज्ञान, भीती, संभ्रम आणि अहंकार दूर करून ज्ञानाचा प्रकाश देणारा तो गुरु.संत ज्ञानेश्वर महाराज म्हणतात—"गुरु हा संतकुळीचा राजा । गुरु हा प्राणविसावा माझा ॥"ही ओळ गुरुचे सामर्थ्य एका प्रतिमेत उभे करते. 'संतकुळीचा राजा' म्हणजे अध्यात्म, ज्ञान आणि सदाचार यांच्या परंपरेचा केंद्रबिंदू. 'प्राणविसावा' हा शब्द आणखी अर्थपूर्ण आहे. जीवनात अनेक प्रश्न, संघर्ष आणि अस्थिरता असते; पण गुरुंच्या सहवासात मनाला शांतता, विचारांना दिशा आणि जीवनाला आशय मिळतो. त्यामुळे गुरु हा केवळ शिक्षक राहत नाही, तर तो अंतःकरणाचा आधार बनतो.याच भावनेचा विस्तार करणारी एक चारोळी—«ज्ञानदीप जो चेतवितो ।अंधार सारे दूर करितो ।संस्कारांची वाट दाखवून ।जीवन सुंदर घडवितो ॥»या चारोळीत गुरुंची तुलना ज्ञानदीपाशी केली आहे. दीप स्वतः जळतो आणि इतरांना प्रकाश देतो. शिक्षकही स्वतःचे आयुष्य विद्यार्थ्यांच्या घडणीत समर्पित करतात. त्यांचे ज्ञान केवळ परीक्षेपुरते मर्यादित नसते; ते जीवन जगण्याची कला शिकवते. म्हणूनच शिक्षणाचा अंतिम उद्देश गुणपत्रिका नव्हे, तर गुणी व्यक्तिमत्त्व घडविणे हा आहे.संत तुकाराम महाराजांनी सद्गुरूचे महत्त्व अनेक अभंगांतून अधोरेखित केले आहे. त्यांच्या विचारांचा गाभा असा की, योग्य गुरुशिवाय जीवनाची दिशा हरवू शकते. ज्ञान मिळविणे महत्त्वाचे आहे; पण त्याहून महत्त्वाचे म्हणजे त्या ज्ञानाचा सदुपयोग कसा करायचा हे शिकणे. गुरु हीच त्या विवेकाची शिदोरी देतात.हीच भावना पुढील चारोळीत उमटते—«शब्द शिकविती गुरु आम्हा ।अर्थ जगण्याचा देती समा ।अक्षरातून माणूस घडवी ।हीच गुरुंची श्रेष्ठ महिमा ॥»अक्षरज्ञान देणे हे शिक्षकाचे पहिले कार्य असले, तरी त्यांची खरी ओळख विद्यार्थ्यांच्या चारित्र्यनिर्मितीत असते. अभ्यासात प्रावीण्य मिळविणारा विद्यार्थी घडविण्यापेक्षा, प्रामाणिक, संवेदनशील आणि जबाबदार नागरिक घडविणे हे गुरुंचे मोठे योगदान असते.संत नामदेव, संत एकनाथ आणि समर्थ रामदास यांच्या वाङ्मयातही गुरुकृपेचे महत्त्व वारंवार अधोरेखित झालेले दिसते. त्यांच्या मते गुरु म्हणजे आत्मपरीक्षण शिकवणारा आरसा. माणसाच्या उणिवा दाखवून त्याच्यातील सामर्थ्य जागविण्याचे कार्य गुरु करतात. म्हणूनच गुरुकृपा ही बाह्य यशापेक्षा अंतर्मन समृद्ध करणारी असते.आजच्या डिजिटल युगात माहितीचे असंख्य स्रोत उपलब्ध आहेत. कृत्रिम बुद्धिमत्ता, इंटरनेट आणि तंत्रज्ञानामुळे ज्ञान मिळविणे सोपे झाले आहे. परंतु माहितीचे विवेकात रूपांतर करणारा, योग्य मूल्यांची जाणीव करून देणारा आणि मानवी संवेदनशीलता जपणारा गुरु कोणतेही तंत्रज्ञान बदलू शकत नाही. समाजाला दिशा देणारा शिक्षक हा आजही तितकाच आवश्यक आहे.गुरु पौर्णिमेच्या निमित्ताने गुरुंना फुले अर्पण करणे ही परंपरा आहे; पण त्याहून मोठी गुरुदक्षिणा म्हणजे त्यांच्या शिकवणीचे आचरण करणे. सत्य, प्रामाणिकपणा, शिस्त, परिश्रम, करुणा आणि मानवता या मूल्यांचे पालन करूनच आपण गुरुंच्या कार्याचा सन्मान करू शकतो."गुरु म्हणजे केवळ धडा शिकवणारा शिक्षक नव्हे; तर माणसातील माणूस जागवणारा, विवेकाचा दीप प्रज्वलित करणारा आणि संस्कारित समाजाचा पाया रचणारा युगनिर्माता होय."



शब्दांकन
**संदीप वाकडे पाटील**
९७६६९९२७७६

**बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002**

**महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.
कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.
संपर्क क्र. 7588005002**